“ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार”

- शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे

**Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur**

# Dattajirao Kadam Arts, Science and Commerce College, Ichalkaranji

# LIBRARY

## Newspaper Clippings

## 2023-24

केसरी

७ जुलै २०२३/४

# राज्य कनोईंग, कायाकिंग स्पर्धेत डी.के.ए.एस.सी.च्या खेळाडूंचे यश



इचलकरंजी : महिला गटात उत्कृष्ट कनोअर्स प्रिया चव्हाण, तर उत्कृष्ट कयाकर्स म्हणून प्रणाली कोपर्डे हिला गौरवण्यात आले.

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी :** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे डी. के. ए. एस. सी. महाविद्यालय, इचलकरंजी महाविद्यालयाच्या खेळाडूंनी सांगलीत झालेल्या १५ वी महाराष्ट्र राज्य कनोईग आणि कायाकिंग स्पर्धेत यश संपादन केले आहे. यामध्ये महाविद्यालयाचे ५ खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. या सर्व खेळाडूंची भोपाळ येथे होणाऱ्या नॅशनल स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

यामध्ये कयाकिंग या प्रकारात श्रीसमर्थ सासणे याने एकूण २ सुवर्ण, २ रोप्य तर ३ कांस्यपदक मिळवले आहे. कौस्तुभ पोकार्डे याने एक रौप्य व कांस्यपदक मिळवले तसेच प्रणाली कोपर्डे याने एकूण ५ सुवर्ण, १ रौप्य तर २ कास्यपदक पटकावले. कनोईंग या प्रकारात प्रिया चव्हाण हिने एकूण ६ सुवर्ण, ४ रौप्य तर ३ कांस्य पदक मिळवले आहे. श्रेयस काळे यांनी एकूण २ सुवर्ण, ८ रौप्य तर १ कास्यपदक पटकावले आहे. या स्पर्धेत महिला गटात उत्कृष्ट कनोअर्स म्हणून प्रिया चव्हाण हिला गौरवण्यात आले, तर उत्कृष्ट कयाकर्स म्हणून प्रणाली कोपर्डे हिला गौरवण्यात आले.

खेळाडूंना प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी शुभेच्छा दिल्या. शारीरिक शिक्षण संचालक प्रा. मुंजफ्फर लगीवाले, प्रा. विनायक भुई, प्रा. प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

शनिवार | आषाढ कृ. ६ पूर्वा भाद्रपद
दि.८ जुलै २०२३
महान कार्य

# डीकेएएससी महाविद्यालयाच्या खेळाडूंचे राज्य कनोईंग, कायाकिंग स्पर्धेत यश

इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे डी. के. ए. एस. सी. महाविद्यालय, इचलकरंजी महाविद्यालयाच्या खेळाडूंनी सांगली येथे संपन्न झालेल्या १५ वी महाराष्ट्र राज्य कनोईंग आणि कायाकिंग स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले आहे यामध्ये महाविद्यालयाचे पाच खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. यामध्ये कयाकिंग या प्रकारात श्रीसमर्थ सासणे याने एकूण दोन सुवर्ण, दोन रोप्य तर तीन कांस्य पदक मिळवले आहे तसेच कौस्तुभ पोकार्डे याने एक रौप्य व एक कांस्य बदक मिळवले तसेच प्रणाली कोपर्डे याने एकूण पाच सुवर्ण, एक रौप्य तर दोन कास्यपदक पटकावले तर कनोईंग या प्रकारात प्रिया चव्हाण हिने एकूण सहा सुवर्ण, चार रौप्य तर तीन कांस्य पदक मिळवले आहे. आणि श्रेयस काळे यांनी एकूण दोन सुवर्ण, आठ रौप्य तर एक कास्यपदक पटकावले आहे. या स्पर्धेत महीला गटात उत्कृष्ट कनोअर्स म्हणून प्रिया चव्हाण हिला गौरवण्यात आले तर उत्कृष्ट कयाकर्स म्हणून प्रणाली कोपर्डे हिला गोर करण्यात आले. या सर्व खेळाडूंची भोपाळ येथे होणाऱ्या नॅशनल स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

CS Scanned with CamScanner

सकाळ कोल्हापूर, गुरुवार, १३ जुलै २०२३

## डीकेएएससी महाविद्यालयात कार्यशाळा

इचलकरंजी, ता. १२ : डीकेएएससी महाविद्यालयात गुणवत्ता हमी कक्षअंतर्गत कार्यशाळा झाली. महाविद्यालय नॅकच्या चौथ्या मूल्यमापनास सामोरे जात आहे. या पार्श्वभूमीवर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. विषयतज्ज्ञ म्हणून विवेकानंद महाविद्यालयाच्या संगणकशास्त्र विभागाच्या प्रा. डॉ. सौ. आर. वाय. पाटील आणि संख्याशास्त्र विभागाचे प्रा. ए. ए. पवार यांनी दोन सत्रांमध्ये मार्गदर्शन केले. या दोन्ही तज्ज्ञांनी विवेचनामध्ये ज्ञानशाखा उद्दिष्टे, विशेष ज्ञानशाखा उद्दिष्टे, विषयांची उद्दिष्टे, उद्दिष्ट निश्चिती, मूल्यांकन, अभिप्राय, सिद्धी, सॉफ्टवेअर गणना अशा विविध मुद्द्यांवर विवेचन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते. महाविद्यालयाचे सकाळसत्रप्रमुख डॉ. डी. सी. कांबळे, दुपार सत्रप्रमुख प्रा. डी. ए. यादव, समन्वयक डॉ. व्ही. व्ही. गानबावले आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

महान कार्य | आषाढ कृ. ११ कृत्तिका
दि. १३ जुलै २०२३

# डी.के.ए.एस.सी.मध्ये आय. क्यू.ए.सी. अंतर्गत कार्यशाळा

**इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था संचालित दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष अंतर्गत एक दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. प्रा.डॉ.सौ.आर.वाय. पाटील आणि प्रा.ए.ए.पवार यांनी दोन सत्रांमध्ये मार्गदर्शन केले. या दोन्ही तज्ज्ञांनी आपल्या विवेचनामध्ये ज्ञानशाखा उद्दिष्टे, विशेष ज्ञानशाखा उद्दिष्टे, विषयांची उद्दिष्टे, उद्दिष्ट निश्चिती, मूल्यांकन, अभिप्राय, सिद्धी, सॉफ्टवेअर गणना अशा विविध मुद्द्यांवर सखोल विवेचन केले. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनिल पाटील होते. स्वागत व प्रस्ताविक निमंत्रक डॉ.निलोफर शेख यांनी केले. तर आभार डॉ.पी.ए.पाटील यांनी व्यक्त केले. यावेळी महाविद्यालयाचे सकाळ सत्र प्रमुख डॉ.डी. सी.कांबळे, दुपार सत्र प्रमुख प्रा डी ए यादव, आय क्यू ए सी समन्वयक डॉ. व्ही.व्ही.गानबावले यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक-प्राध्यापिका उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. अर्चना तराळ व प्रा.एम.यु.पाटील यांनी केले

CS Scanned with CamScanner

# डीकेएएससीमध्ये कार्यशाळा संपन्न

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी** : श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था संचालित दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष अंतर्गत एक दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली.

महाविद्यालय नॅकच्या चौथ्या मूल्यमापनास सामोरे जात आहे. या पार्श्वभूमीवर या एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. विषयतज्ज्ञ साधन व्यक्ती म्हणून विवेकानंद महाविद्यालयाच्या संगणक शास्त्र विभागाच्या प्रा. डॉ. आर. वाय. पाटील आणि संख्याशास्त्र विभागाचे प्रा. ए. ए. पवार यांनी दोन सत्रांमध्ये मार्गदर्शन केले.

या दोन्ही तज्ज्ञांनी ज्ञानशाखा उद्दिष्टे, विशेष ज्ञानशाखा उद्दिष्टे, विषयांची उद्दिष्टे, उद्दिष्ट निश्चिती, मूल्यांकन, अभिप्राय, सिद्धी, सॉफ्टवेअर गणना अशा विविध मुद्द्यांवर सखोल विवेचन केले.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते. ते म्हणाले, नव्या शिक्षण धोरणात उच्च शिक्षणाची उद्दिष्टे आणि साध्ये या अनुषंगाने वस्तुनिष्ठ निष्कर्षांना अधिक महत्त्व येत आहे.महाविद्यालय त्या दिशेने वाटचाल करीत आहे.

स्वागत डॉ. निलोफर शेख यांनी केले. तर आभार डॉ. पी. ए. पाटील यांनी व्यक्त केले.यावेळी डॉ. डी. सी. कांबळे, दुपार सत्र प्रमुख प्रा. डी. ए. यादव, डॉ. व्ही. व्ही. गानबावले उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. अर्चना तराळ व प्रा. एम. यु. पाटील यांनी केले.

9921600800

केसरी

13-7-2023

तरुण भारत गुरूवार, १३ जुलै २०२३

# इचलकरंजीसाठी मेजर विरकरांचे योगदान

■ सुनील पाटील
प्रतिनिधी
इचलकरंजी

मागील २२ वर्षांमध्ये इचलकरंजीतील विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत प्रा. मेजर मोहन वीरकर यांचा वाटा सिंहाचा आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शेकडो विद्यार्थी पोलीस, प्रशासक, आर्मी, नेव्ही आणि इतर शासकीय क्षेत्रांमध्ये मोठ्या पदावर कार्यरत आहेत. त्यांचे हे योगदान इचलकरंजी कधीच विसरणार नाही, असे प्रतिपादन सुनील पाटील यांनी केले.

येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयात २२ वर्षांहून अधिक सेवा करणारे प्रा. मेजर मोहन विरकर यांची श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या एल.बी. एस कॉलेज सातारा येथे बदली झाली. इचलकरंजी शहरातील प्रदीर्घ सेवेच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालय, महानगरपालिका, माजी विद्यार्थी यांच्यावतीने सर्व क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते त्यांचा शुभेच्छा समारंभ पार पडला.



इचलकरंजी : प्रा. मेजर मोहन वीरकर यांचा सत्कार करताना सुनील पाटील, प्राचार्य डॉ. अनिल पाटील, मेजर एम. जी. गायकयाड, पोलीस निरीक्षक सत्यवान हाके, नितीन जांभळे, पैलवान अमृत भोसले, प्रा. शेखर शहा.

या शुभेच्छा समारंभानिमित्त प्रा. व्ही. बी पाटील, प्रा शेखर शहा, दशरथ माने, माजी बांधकाम सभापती नितीन जांभळे, महानगरपालिका नगरसचिव विजय राजापुरे, शहापूर पोलीस निरीक्षक सत्यवान हाके, उपमहाराष्ट्र केसरी अमृत भोसले, आणि मेजर एम. जी. गायकवाड यांनी मनोगते व्यक्त केले. मान्यवरांनी प्रा. मेजर विरकर यांनी सेवा काळात केलेल्या कार्याचे कौतुक केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते.स्वागत प्रा. रोहित शिंगे यांनी केले. आभार अरुण काशीद यांनी मानले. यावेळी प्रा. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, प्रा. एम. एम. कांबळे, प्रा. विनायक भोई. प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्राध्यापक, प्राध्यापिका, विद्यार्थी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

महान कार्य | आषाढ कृ. १२ रोहिणी
दि. १४ जुलै २०२३

# मेजर मोहन विरकर यांना शुभेच्छा



इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा

येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयात मेजर मोहन विरकर यांना बदली निमित्त माजी विद्यार्थी यांच्या वतीने शुभेच्छा समारंभ पार पडला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.अनिल पाटील होते. या शुभेच्छा समारंभाच्या निमित्ताने सुनील पाटील, प्रा.व्ही.बी. पाटील, प्रा.शेखर शहा, दशरथ माने, नितीन जांभळे, विजय राजापुरे, पोलीस निरीक्षक सत्यवान हाके, अमृत भोसले, मेजर एम.जी. गायकवाड यांनी मनोगते व्यक्त केली. स्वागत प्रा रोहित शिंगे यांनी तर आभार अरुण काशीद यांनी मांडले.

यावेळी प्रा.डी.सी. कांबळे व प्रा.डी.ए. यादव, प्रा.एम.एम कांबळे, ऋषिकेश राऊत, प्रा.विनायक भोई, प्रा.मुजफ्फर लगीवाले यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका आणि विद्यार्थी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ
मंगळवार, १८ जुलै २०२३



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयातील प्रा. मेजर वीरकर यांचा सेवा सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

# प्रा. मोहन वीरकर यांचा बदलीनिमित्त सत्कार

इचलकरंजी, ता. १७ : विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत प्रा. मेजर मोहन वीरकर यांचा वाटा सिंहाचा आहे. त्यांचे योगदान अतुलनीय असून इचलकरंजी शहर कायम कृतज्ञ राहील, असे प्रतिपादन सन्मती सहकारी बँकेचे चेअरमन सुनील पाटील यांनी केले.

येथील डीकेएएससी महाविद्यालयात २२ वर्षांहून अधिक सेवा करून प्रा. वीरकर यांची श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या एल. बी. एस. कॉलेज सातारा येथे नुकतीच बदली झाली. त्यानिमित्त आयोजित शुभेच्छा समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. महाविद्यालय, महानगरपालिका, माजी विद्यार्थी यांच्यातर्फे आयोजन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते. प्रा. वीरकर यांचा सेवा सन्मानपत्र देऊन सत्कार केला.

शहापूर पोलिस निरीक्षक सत्यवान हाके, अमृत भोसले, प्रा. व्ही. बी पाटील, प्रा. शेखर शहा, नितीन जांभळे, विजय राजापुरे, मेजर एम. जी. गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत बुधवार, १९ जुलै २०२३

# डीकेएएससीमध्ये आयक्यूएसी अंतर्गत कार्यशाळेस प्रतिसाद

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था संचालित दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष अंतर्गत कार्यशाळा झाली. महाविद्यालय नॅकच्या चौथ्या मूल्यमापनास सामोरे जात आहे. या पार्श्वभूमीवर या कार्यशाळेचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते.

विषयतज्ज्ञ साधन व्यक्ती म्हणून विवेकानंद महाविद्यालयाच्या संगणक शास्त्र विभागाच्या प्रा. डॉ. सौ. आर. वाय. पाटील आणि संख्याशास्त्र विभागांचे प्रा. ए. ए. पवार यांनी दोन सत्रांमध्ये मार्गदर्शन केले. या दोन्ही तज्ज्ञांनी विवेचनामध्ये ज्ञानशाखा उद्दिष्टे, विशेष ज्ञानशाखा उद्दिष्टे, विषयांची उद्दिष्टे, उद्दिष्ट निश्चिती, मूल्यांकन, अभिप्राय, सिद्धी, सॉफ्टवेअर गणना अशा विविध मुद्यांवर विवेचन केले.

प्राचार्य डॉ. अनिल पाटील म्हणाले, नव्या शिक्षण धोरणात उच्च शिक्षणाची उद्दिष्टे आणि साध्ये या अनुषंगाने वस्तुनिष्ठ निष्कर्षांना अधिक महत्त्व येत आहे. महाविद्यालय त्या दिशेने वाटचाल करीत आहे. स्वागत निमंत्रक डॉ. निलोफर शेख यांनी केले. आभार डॉ. पी. ए. पाटील यांनी व्यक्त केले. यावेळी डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, आय. क्यू. ए.सी. डॉ. व्ही. व्ही. गानबावले, प्राध्यापक उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. अर्चना तराळ व प्रा. एम. यु. पाटील यांनी केले.

CS Scanned with CamScanner

# डी.के.ए.एस.सी.मध्ये 'नवे राष्ट्रीय शिक्षण धोरण सप्ताहा'चे उद्घाटन

**इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा**

येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयात 'नवे राष्ट्रीय शिक्षण धोरण सप्ताहाचा' उद्घाटन समारंभ पार पडला. या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून मा. डॉ. प्रभाकर निसर्गंध उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन आणि दीप प्रज्वलनाने समारंभास सुरुवात झाली.

समारंभात उद्घाटक म्हणून बोलताना उच्च शिक्षणात येणाऱ्या नव्या संकल्पना, धोरणे, प्रवाह अग्रक्रमाने राबविणारे डी. के.ए.एस.सी.कॉलेज विकासोन्मुख महाविद्यालय आहे. असे प्रशंसोद्गार काढत शिक्षण धोरणावर विचार मांडताना डॉ.निसर्गंध म्हणाले, शिक्षक हा फक्त शिक्षण देणारा नसून तो अनुभवी सल्लागार, मदतनीस, मार्गदर्शक असला पाहिजे. विद्यार्थी घोकंपट्टी करणारा नव्हे तर ज्ञान, कौशल्य आत्मसात करणारा असेल. एकूणच आनंददायी शिक्षणातून स्थानिक दर्जा हाच जागतिक दर्जा असणारे शिक्षण आकारास येत आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनिल पाटील यांनी समारंभाचे अध्यक्षस्थान भूषविले. कार्यक्रमाचे स्वागत, परिचय आणि प्रास्ताविक डॉ.ए.पी. जाधव यांनी केले. यावेळी डॉ.डी.सी कांबळे, दुपार सत्राचे प्रमुख प्रा. डी.ए.यादव यांच्यासह प्राध्यापक प्राध्यापिका उपस्थित होते. समारंभाचे आभार आय. क्यू.ए.सी., डॉ.व्ही.व्ही. गानबावले यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा.मयूरेश पाटील यांनी केले.

सकाळ




**इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये नवे राष्ट्रीय शिक्षण धोरण सप्ताहाच्या उद्‌घाटनप्रसंगी डॉ. प्रभाकर निसर्गंध यांनी मार्गदर्शन केले.**

# 'डीकेएएससी'मध्ये नवे राष्ट्रीय शिक्षण धोरण सप्ताह

**इचलकरंजी :** डीकेएएससी कॉलेजमध्ये नवे राष्ट्रीय शिक्षण धोरण सप्ताहाचे उद्‌घाटन झाले. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. प्रभाकर निसर्गंध उपस्थित होते. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आलेल्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत नव्या शिक्षण धोरणाची सुरुवात आहे. या धोरणात स्तररचना पाश्चात्त्य असली तरी आदर्श तक्षशिला, नालंदामधील भारतीय शिक्षणच आहे. आनंददायी शिक्षणातून स्थानिक दर्जा हाच जागतिक दर्जा असणारे शिक्षण आकारास येत असल्याचे मत डॉ. निसर्गंध यांनी मांडले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते. स्वागत, परिचय आणि प्रास्ताविक समिती समन्वयक डॉ. ए. पी. जाधव यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. मयूरेश पाटील यांनी केले. आयक्यूएसी समन्वयक डॉ. व्ही. व्ही. गानबावले यांनी आभार मानले.

Kolhapur, Gadhinglaj-Today
28/07/2023 Page No. 2

सकाळ

# 'डीकेएएससी'मध्ये मुलींना स्वसंरक्षणाचे धडे



इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये मुलींसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले.

इचलकरंजी, ता. २७ : डीकेएएससी कॉलेजमध्ये मुलींसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबिर घेतले. राजमाता जिजाऊ युवती प्रशिक्षण केंद्र व महाविद्यालयातील एनसीसी, तसेच जिमखाना विभागातर्फे विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाविषयी माहिती देऊन समुपदेशन केले. शिबिर दोन सत्रामध्ये घेतले.

पहिल्या सत्रामध्ये मुलींना स्वसंरक्षणाबाबत मार्गदर्शन व समुपदेशन केले. प्रमुख पाहुणे शिवाजीनगर ठाण्याचे पोलिस निरीक्षक राजू ताशिलदार, अखिल भारतीय विद्यार्थी संघटनेच्या अदिती कुलकर्णी होत्या. विद्यार्थिनींनी कोणतीही गोष्ट आत्मविश्वासाने केल्यास त्या नक्की यशस्वी होतात. तसेच विद्यार्थिनींनी अत्याचार किंवा गैरकृत्यासंदर्भात कशा पद्धतीने सामोरे जावे, याविषयी माहिती सौ. कुलकर्णी यांनी दिली.

तारुण्याच्या वयामध्ये मुलींनी कोणताही निर्णय घेताना आई-वडिलांचा विचार केला तर तो कधीच चुकणार नाही. कायदा कशा पद्धतीने मुलींचे संरक्षण करतो व धाडसाने कसे उभे राहावे, याबाबत पोलिस निरीक्षक श्री. ताशिलदार यांनी मार्गदर्शन केले.

दुसऱ्या सत्रात विपुल मोहिते, शाहरुख अत्तार, सतीश वाडगेकर या प्रशिक्षकांनी मुलींना प्रशिक्षण देऊन सराव करवून घेतला. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी मुलींना शिस्त व महाविद्यालय नेहमी विद्यार्थिनींच्या पाठीशी असेल, अशी भावना व्यक्त केली. शिबिराचे नियोजन जिमखाना विभागप्रमुख प्रा. विनायक भोई, प्रा. मुझफ्फर लगीवाले, प्रा. प्रशांत कांबळे आदींनी केले.

Kolhapur, Gadhinglaj-Today
28/07/2023 Page No. 2

# डी.के.ए.एस.सी.मध्ये वाङ्मय मंडळाचे उद्घाटन

केसरी वृत्तसेवा

**कोल्हापूर** : साहित्य निर्माण करणारा साहित्यिक आणि त्याचा आस्वाद घेणारा रसिक ही माणसे कधीही नैराश्यातून टोकाची भूमिका घेत नाहीत, साहित्यावरील श्रद्धा आणि साहित्याची गोडी आपल्याला जगण्याच्या कोणत्याही वळणावर उभे राहण्याची प्रेरणा देतात, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक, संत साहित्याचे अभ्यासक प्रा. राजा माळगी यांनी केले. येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स ॲण्ड कॉमर्स महाविद्यालयातील वाङ्मय मंडळाचे उद्घाटन आणि 'विवेक' वार्षिक नियतकालिकाचे प्रकाशन अशा संयुक्त कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

प्रास्ताविक डॉ. प्रभा पाटील यांनी केले. यावेळी प्रा. विश्वंभर कुलकर्णी, प्रा. रोहित शिंगे यांनी मनोगते व्यक्त केली. संजीवनी कदम, प्रियांका भाटले, अवंतिका खराडे या विद्यार्थिनींनी आपल्या कविता सादर केल्या. महाविद्यालयाचे सकाळ सत्र प्रमुख डॉ. डी. सी. कांबळे, दुपार सत्र प्रमुख प्रा. डी. ए. यादव यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका, विद्यार्थी– विद्यार्थिनी उपस्थित होते. डॉ. सुनिता वेल्हाळ यांनी आभार मानले. तर सूत्रसंचालन डॉ. अंजली उबाळे आणि प्रा. अर्चना नंदगावे यांनी केले.

9921600800

केसरी

28-7-2023

तरुण भारत शुक्रवार, २८ जुलै २०२३

# साहित्यिक व रसिक नैराश्यातून टोकाची भूमिका घेत नाहीत

## प्रा. राजा माळगी : डीकेएएससीमध्ये वाङ्मय मंडळाचे उद्घाटन, विवेक अंकाचे प्रकाशन

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

साहित्य निर्माण करणारा साहित्यिक आणि त्याचा आस्वाद घेणारा रसिक ही माणसे कधीही नैराश्यातून टोकाची भूमिका घेत नाहीत, साहित्यावरील श्रद्धा आणि साहित्याची गोडी आपल्याला जगण्याच्या कोणत्याही वळणावर उभे राहण्याची प्रेरणा देतात, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक, संत साहित्याचे अभ्यासक प्रा. राजा माळगी यांनी केले.

येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स ॲण्ड कॉमर्स महाविद्यालयातील वाङ्मय मंडळाचे उद्घाटन व विवेक वार्षिक नियतकालिकाचे प्रकाशन अशा संयुक्त कार्यक्रमात ते बोलत होते. प्रा. माळगी म्हणाले, दारातल्या रांगोळीवरून घराचे घरपण आणि संस्कार कळतात त्याप्रमाणे



**इचलकरंजी : डीकेएएससीमध्ये विवेक वार्षिक नियतकालिकेच्या प्रकाशनप्रसंगी साहित्यिक प्रा. राजा माळगी, प्राचार्य डॉ. अनिल पाटील व मान्यवर.**

महाविद्यालयाचे वार्षिक नियतकालिक महाविद्यालयाच्या विविध उपक्रमांचा, गौरवशाली परंपरेचा आणि संस्कारांचा दस्तऐवज असते. अशा नियतकालिकांमुळेच विद्यार्थ्यांमध्ये साहित्य लेखनाची रुची निर्माण होते. वाङ्मय आणि साहित्यरुची माणसाची बौद्धिक आणि मानसिक गरज आहे. त्यामुळे स्वत:मधील आस्वादकता, रसिकता वाढवा. बुद्धीवादाला संवेदनशीलतेची जोड मिळाली की माणूस म्हणून समृद्ध होता येते. प्राचार्य डॉ. अनिल पाटील म्हणाले, शाश्वत आनंद देण्याचे सामर्थ्य फक्त साहित्यामध्ये आहे. आपली भाषा, संस्कृती आपण जतन केली पाहिजे. पाहुण्यांचा परिचय प्रा. संजय सुतार यांनी करून दिला. प्रास्ताविक डॉ. प्रभा पाटील यांनी केले. यावेळी प्रा. विश्वंभर कुलकर्णी, प्रा. रोहित शिंगे यांनी मनोगत व्यक्त केले. संजीवनी कदम, प्रियांका भाटले, अवंतिका खराडे या विद्यार्थिनींनी कविता सादर केल्या. डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए यादव, प्राध्यापक, प्राध्यापिका, विद्यार्थी–विद्यार्थिनी उपस्थित होत्या. डॉ. सुनिता वेल्हाळ यांनी आभार मानले. सूत्रसंचालन डॉ. अंजली उबाळे, प्रा. अर्चना नंदगावे यांनी केले.

CS Scanned with CamScanner

महान कार्य

अधिक श्रावण शु.१० अनुराधा
दि. २८ जुलै २०२३

# डी.के.ए.एस.सी.मध्ये मुलींसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबिर संपन्न

**इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा**

डी.के.ए.एस.सी. कॉलेजमध्ये राजमाता जिजाऊ युवती प्रशिक्षण केंद्र व महाविद्यालयातील एन.सी.सी.तसेच जिमखांना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील विद्यार्थिनींना स्वसंरक्षणा विषयी माहिती व समुपदेशन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी नगर पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक राजू ताशिलदार व अदिती कुलकर्णी उपस्थित होत्या. विद्यार्थिनींनी आत्मविश्वासाने कोणतीही गोष्ट केल्यास त्या नक्की यशस्वी होतात. तसेच विद्यार्थिनींनी अत्याचार किंवा गैरकृत्य संदर्भात कशा पद्धतीने सामोरे जावे या विषयी माहिती प्रमुख पहुण्या अदिती कुलकर्णी यांनी दिली. तारुण्याच्या वयामध्ये मुलींनी कोणताही निर्णय घेताना आई वडिलांचा विचार केला तर त्यांचा निर्णय कधीच चुकणार नाही व कायदा.कशा पद्धतीने मुलींचे संरक्षण करतो व त्यांनी धाडसाने कसे उभे रहावे विषयी पोलिस निरीक्षक राजू ताशिलदार साहेब यांनी मार्गदर्शन केले.

महान कार्य

अधिक श्रावण शु. १२ मुळ
दि.३० जुलै २०२३

# डीकेएएससीमध्ये नवे शिक्षण धोरण सप्ताहाला प्रारंभ

इचलकरंजी /महान कार्य वृत्तसेवा

डीकेएएससी कॉलेजमध्ये नवे राष्ट्रीय शिक्षण धोरण सप्ताहाचे उद्घाटन झाले. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. प्रभाकर निसर्गंध उपस्थित होते. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आलेल्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत नव्या शिक्षण धोरणाची सुरुवात आहे.

या धोरणात स्तररचना पाश्चात्त्य असली तरी आदर्श तक्षशिला, नालंदामधील भारतीय शिक्षणच आहे. आनंददायी शिक्षणातून स्थानिक दर्जा हाच जागतिक दर्जा असणारे शिक्षण आकारास येत असल्याचे मत डॉ. निसर्गंध यांनी मांडले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते. स्वागत, परिचय आणि प्रास्ताविक समिती समन्वयक डॉ. ए. पी. जाधव यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. मयूरेश पाटील यांनी केले. आयक्यूएसी समन्वयक डॉ. व्ही. व्ही. गानबावले यांनी आभार मानले.

CS Scanned with CamScanner

सकाळ



**इचलकरंजी :** डीकेएएससी व नाईट कॉलेजमध्ये सामंजस्य करार करण्यात आला.

# डीकेएएससी, नाईट कॉलेजमध्ये सामंजस्य करार

**इचलकरंजी :** डीकेएएससी व नाईट कॉलेजमध्ये सामंजस्य करार केला. या कराराअंतर्गत दोन्ही शैक्षणिक संस्थांमध्ये विविध उपक्रमांचे आदानप्रदान केले जाणार आहे. नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणाला तीन वर्षे पूर्ण झाल्याच्या औचित्याने डीकेएएससी कॉलेजने हा सामंजस्य करार केला. शिवाजी विद्यापीठाने प्रक्षेपित केलेल्या नव्या शिक्षण धोरणातील उच्च शिक्षणविषयक माहिती देणाऱ्या आभासी संवाद कार्यक्रमात दोन्ही महाविद्यालयांनी सहभाग घेतला. प्राध्यापकांची गटचर्चाही आयोजित केली. प्राचार्य डॉ. अनिल पाटील, प्राचार्य डॉ. पी. डी. नारे, डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, डॉ. आर. एल. कोरे, डॉ. अर्जुन जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

Kolhapur, Ichalkaranji-Today
31/07/2023 Page No. 3

तरुण भारत
सोमवार, ३१ जुलै २०२३



इचलकरंजी : नवीन शिक्षण धोरण सप्ताहांतर्गत डीकेएएससी व नाईट कॉलेजमध्ये सामंजस्य कराप्रसंगी प्राचार्य डॉ. अनिल पाटील, प्राचर्य डॉ. पी. डी. नारे, डॉ. कांबळे, प्रा. यादव, डॉ. कोरे, डॉ. जाधव.

# डीकेएएससी व नाईट कॉलेजमध्ये सामंजस्य करार

**इचलकरंजी :** महाराष्ट्र शासन उच्च शिक्षण विभाग यांच्या निर्देशानुसार नवीन शिक्षण धोरण सप्ताह महाविद्यालयांमध्ये साजरा होत आहे. या राष्ट्रीय शिक्षण धोरणाला तीन वर्षे पूर्ण होत असल्याच्या औचित्याने सप्ताहात डिकेएएससी कॉलेजमध्ये विविध उपक्रम होत आहेत. याचाच भाग म्हणून श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी व नाईट कॉलेज, इचलकरंजी या दोन शैक्षणिक संस्थांमध्ये सामंजस्य करार करण्यात आला. प्रस्तुत करारांतर्गत दोन्ही शैक्षणिक संस्थांमध्ये उपक्रमांचे आदानप्रदान केले जाणार आहे. शिवाजी विद्यापीठाने प्रक्षेपित केलेल्या नव्या शिक्षण धोरणातील उच्च शिक्षण विषयक माहिती देणाऱ्या आभासी संवाद कार्यक्रमात महाविद्यालय सहभागी झाले होते. याप्रसंगी प्राध्यापकांची गटचर्चाही आयोजित केली होती. यावेळी प्राचार्य डॉ. अनिल पाटील, प्राचार्य डॉ. पी. डी. नारे, डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, डॉ. आर. एल. कोरे, डॉ. अर्जुन जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. समारंभात दोन्ही महाविद्यालयांचे प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी सहभागी झाले होते.

CS Scanned with CamScanner

# थोडक्यात महत्त्वाचे



इचलकरंजी : डीकेएएससी-नाईट कॉलेज यांच्यात सामंजस्य करारावेळी डॉ. अनिल पाटील, डॉ. पी. डी. नारे, डॉ. डी.सी.कांबळे.

## डीकेएएससी-नाईट कॉलेज यांच्यात सामंजस्य करार

केसरी वृत्तसेवा

**इचलकरंजी :** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज व नाईट कॉलेज, इचलकरंजी या दोन महविद्यालयामध्ये सामंजस्य करार करण्यात आला. 'नवीन शिक्षण धोरण सप्ताह' महाविद्यालयांमध्ये साजरा होत आहे.. करारांतर्गत दोन्ही शैक्षणिक संस्थांमध्ये उपक्रमांचे आदान-प्रदान केले जाणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या उच्च शिक्षण विषयक माहिती देणाऱ्या आभासी संवाद कार्यक्रमात दोन्ही महाविद्यालयांनी सहभाग घेतला. यावेळी डॉ. अनिल पाटील, डॉ. पी. डी. नारे, डॉ.डी.सी.कांबळे, प्रा.डी.ए. यादव, डॉ.आर.एल. कोरे, डॉ. अर्जुन जाधव यांची उपस्थिती होती.

9921600800

केसरी

31-7-2023

महान कार्य
अधिक श्रावण शु.१५ उ.षाढा
दि. ०१ ऑगस्ट २०२३

# डिकेएएससी, नाईट कॉलेजमध्ये सामंजस्य करार



इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा

महाराष्ट्र शासन उच्च शिक्षण विभाग यांच्या निर्देशानुसार ' नवीन शिक्षण धोरण सप्ताह ' महाविद्यालयांमध्ये साजरा होत आहे. या राष्ट्रीय शिक्षण धोरणाला तीन वर्षे पूर्ण होत असल्याच्या औचित्याने सदर सप्ताहात डिकेएएससी कॉलेजमध्ये विविध उपक्रम संपन्न होत आहेत. याचाच भाग म्हणून श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी व नाईट कॉलेज, इचलकरंजी या दोन शैक्षणिक संस्थांमध्ये सामंजस्य करार (चेण) करण्यात आला. प्रस्तुत करारा अंतर्गत दोन्ही शैक्षणिक संस्थांमध्ये उपक्रमांचे आदानप्रदान केले जाणार आहे. शिवाजी विद्यापीठाने प्रक्षेपित केलेल्या नव्या शिक्षण धोरणातील उच्च शिक्षण विषयक माहिती देणाऱ्या आभासी संवाद कार्यक्रमात महाविद्यालय सहभागी झाले होते. यावेळी डॉ.अनिल पाटील, डॉ. पी.डी. नारे, डॉ.डी.सी.कांबळे, प्रा.डी.ए.यादव,डॉ.आर.एल. कोरे, डॉ.अर्जुन जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. महाविद्यालयांचे प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी सहभागी झाले होते.

Scanned with CamScanner



डीकेएएससी महाविद्यालयातील 'विवेक' नियतकालिकाचे प्रकाशन करताना प्रा. राजा माळगी, डॉ. अनिल पाटील आदी.

# डीकेएएससीमध्ये 'विवेक' अंकाचा प्रकाशन समारंभ संपन्न

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी :** साहित्य निर्माण करणारा साहित्यिक आणि त्याचा आस्वाद घेणारा रसिक ही माणसे कधीही नैराश्यातून टोकाची भूमिका घेत नाहीत, साहित्यावरील श्रद्धा आणि साहित्याची गोडी आपल्याला जगण्याच्या कोणत्याही वळणावर उभे राहण्याची प्रेरणा देतात, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक, संत साहित्याचे अभ्यासक प्रा. राजा माळगी यांनी केले.

येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स ॲण्ड कॉमर्स महाविद्यालयातील वाङ्मय मंडळाचे उद्घाटन आणि 'विवेक' वार्षिक नियतकालिकाचे प्रकाशन अशा संयुक्त कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. स्वागत प्रा. संजय सुतार यांनी तर प्रास्ताविक डॉ. प्रभा पाटील यांनी केले. संजीवनी कदम, प्रियांका भाटले, अवंतिका खराडे या विद्यार्थिनींनी आपल्या कविता सादर केल्या. डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए यादव यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका, विद्यार्थी–विद्यार्थिनी उपस्थित होते. कार्यक्रमात डॉ. सुनिता वेल्हाळ यांनी आभार, सूत्रसंचालन डॉ. अंजली उबाळे आणि प्रा. अर्चना नंदगावे यांनी केले.

# हत्तींचा वावर करा : 

**केसरी वृत्तसेवा**

कोल्हापूर : आजरा

📞 9921600800

केसरी

1-8-2023

सकाळ

# 'डीकेएएससी'त वाङ्मय मंडळ सुरू

इचलकरंजी, ता. १ : साहित्यावरील श्रद्धा आणि साहित्याची गोडी आपल्याला जगण्याच्या कोणत्याही वळणावर उभे राहण्याची प्रेरणा देतात,' असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक, संत साहित्य अभ्यासक प्रा. राजा माळगी यांनी केले.

येथील डीकेएएससी महाविद्यालयातील वाङ्मय मंडळाच्या उद्घाटनप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी 'विवेक' वार्षिक नियतकालिकाचे प्रकाशनही प्रमुख मान्यवरांच्या हस्ते केले. प्राचार्य डॉ. अनिल पाटील, प्रा. विश्वंभर कुलकर्णी, प्रा. रोहित शिंगे यांनी मनोगत व्यक्त केले. संजीवनी कदम, प्रियांका भाटले, अवंतिका खराडे या विद्यार्थिनींनी कविता सादर केल्या.

Kolhapur, Gadhinglaj-Today
02/08/2023 Page No. 4

सकाळ



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयाने नेचर कॉंझर्व्हेशन सोसायटीशी सामंजस्य करार केला.

## 'डीकेएएससी-नेचर कॉंझर्व्हेशन'मध्ये सामंजस्य करार

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयाने नेचर कॉंझर्व्हेशन सोसायटी, सांगलीशी सामंजस्य करार केला. या कराराअंतर्गत विविध उपक्रमांचे आदानप्रदान केले जाणार आहे. विशेष करून पर्यावरणीय उपक्रमावर भर दिला जाणार आहे. नेचर कॉंझर्व्हेशन सोसायटीकडून विविध स्तरावर पर्यावरण जनजागृतीसाठी कृतिशील प्रयत्न केले जातात. प्राचार्य डॉ. अनिल पाटील, उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, प्रा. डॉ. पी. के. वाघमारे, प्रा. डॉ. निलोफर शेख आदी उपस्थित होते.

Kolhapur, Gadhinglaj-Today
04/08/2023 Page No. 4

सकाळ

# चुका सुधारून आनंदात जगणे शक्य

## न्यायदंडाधिकारी घुले : डीकेएएससी महाविद्यालयात अँटी रॅगिंगबाबत मार्गदर्शन

**सकाळ वृत्तसेवा**




**इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये न्यायदंडाधिकारी जी. ए. घुले यांनी मार्गदर्शन केले. व्यासपीठावर अप्पर पोलिस अधीक्षक निकेश खाटमोडे - पाटील, प्राचार्य डॉ. अनिल पाटील, ॲड. शिवराज चुडमुंगे उपस्थित होते.**

इचलकरंजी, ता. ४ : महाविद्यालयीन जीवनात आपल्याकडून लहान-सहान चुका होत असतातच. अशा चुका वेळोवेळी सुधारून आणि मर्यादा समजूनही जीवन आनंदाने जगता येते. रॅगिंगसारखे प्रकार क्षणभराचा आनंद देतात. मात्र याचा परिणाम आपल्या संबंधित आयुष्यावर होऊ शकतो. याची सतत जाणीव विद्यार्थ्यांनी ठेवून चांगले भविष्य घडवावे, असे प्रतिपादन प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी जी. ए. घुले यांनी केले.

विधी सेवा समिती हातकणंगले आणि इचलकरंजी बार असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने डीकेएएससी महाविद्यालयात अँटी रॅगिंग ॲक्टबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व्याख्यान झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते. दुसरे वक्ते अप्पर पोलिस अधीक्षक निकेश खाटमोडे - पाटील यांनी एखादा लहान गुन्हा सुद्धा करिअरच्या वाटेवरचा मोठा अडथळा ठरू शकतो.

त्यामुळे कोणत्याही प्रकारची चूक होणार नाही याची सजगता विद्यार्थ्यांनी ठेवायला हवी, असे सांगितले. बार कौन्सिलचे अध्यक्ष ॲड. शिवराज चुडमुंगे यांनी मनोगत व्यक्त केले. दुपार सत्र प्रमुख प्रा. डी. ए. यादव, ॲड. राजीव शिंगे, ॲड. असिफ मुल्ला, ॲड. सुधीर मस्के, ॲड. दत्ता बडे, अभिजित पाटील आदी उपस्थित होते. प्रास्ताविक सकाळ सत्र प्रमुख डॉ. डी. सी. कांबळे यांनी केले. डॉ.एस. टी इंगळे यांनी आभार मानले. डॉ. आतिश पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

Kolhapur, Gadhinglaj-Today
05/08/2023 Page No. 2

दैनिक **महासत्ता** शनिवार, ता.५ ऑगस्ट २०२३

## हातकणंगले, इचलकरंजी बार असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने

# डीकेएएससीमध्ये अँटी रॅगिंग ॲक्टबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**इचलकरंजी, ता.४**

विधी सेवा समिती हातकणंगले आणि इचलकरंजी बार असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी येथे अँटी रॅगिंग क्ट संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व्याख्यान संपन्न झाले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी मा. जी. ए घुले आणि अप्पर पोलीस अधीक्षक मा. निकेश खाटमोडे – पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

महाविद्यालयीन जीवनामध्ये आपल्याकडून लहान–सहान चुका होत असतातच परंतु त्या चुका सुधारून मर्यादा समजून घेऊन सुद्धा महाविद्यालयीन जीवन आनंदाने जगता येते. रॅगिंग सारखे प्रकार क्षणभराचा आनंद देतात परंतु आपल्या सबंध आयुष्यावर त्याचा परिणाम होऊ शकतो याची जाणीव विद्यार्थ्यांनी ठेवावी व चांगले भविष्य घडवावे असे प्रतिपादन प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी मा. जी. ए. घुले यांनी केले. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक श्री निकेश खाटमोडे साहेब आपल्या मनोगत म्हणाले एखादा लहान सहान गुन्हा सुद्धा आपल्या करिअरच्या वाटेवरचा मोठा अडथळा ठरू शकतो त्यामुळे आपल्याकडून कोणत्याही प्रकारची चूक होणार नाही याची सजगता विद्यार्थ्यांनी ठेवायला हवी. आणि अपार कष्ट करून आपले भविष्य घडवायला हवे. आपल्या अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. अनिल पाटील म्हणाले, दोन्ही मान्यवरांनी अतिशय संवेदनशील विषयावर नेमके पणाने केलेले मार्गदर्शन आमच्या विद्यार्थ्यांसाठी मौलिक स्वरूपाचे आहे. यावेळी इचलकरंजी बार कौन्सिलचे अध्यक्ष शिवराज चुडमुंगे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.




महाविद्यालयातील अँटी रॅगिंग समितीच्या वतीने या व्याख्यानाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सकाळ सत्र प्रमुख डॉ. डी. सी. कांबळे यांनी केले. यावेळी दुपार सत्र प्रमुख प्रा. डी. ए यादव, ड. राजीव शिंगे,ड. असिफ मुल्ला, ड. सुधीर मस्के, ड. दत्ता बडे, अभिजीत पाटील यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका,विद्यार्थी – विद्यार्थिनी उपस्थित होते. डॉ,.एस. टी इंगळे यांनी आभार व्यक्त केले. तर डॉ. अतिश पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

CS Scanned with CamScanner

सकाळ

# 'डीकेएएससी'मध्ये आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन

**इचलकरंजी :** डीकेएएससी कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन सप्ताहानिमित्त व्याख्यान झाले. प्राणीशास्त्र विभागातर्फे आयोजित व्याख्यानात नेचर कॉँझर्वेशन सोसायटीचे अध्यक्ष तरबेज खान, अमोल जाधव यांनी मार्गदर्शन केले. सध्याची स्थिती, बदलता अधिवास, बदलत्या सवयीमुळे प्राण्यांचा मानवासोबतचा वाढता संघर्ष, याची कारणे आणि संघर्ष कमी करण्याचे उपायांबाबत त्यांनी सखोल मार्गदर्शन केले. राष्ट्रीय प्राणी वाघ याविषयी भित्तीपत्रिकेचे उद्‌घाटन प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते झाले. प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांची ओळख प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. पद्मश्री वाघमारे यांनी करून दिली. सूत्रसंचालन व आभार डॉ. निलोफर शेख यांनी मानले. उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे, प्रा.डी .ए.यादव, डॉ. सुभाष इंगळे यांसह प्राध्यापक उपस्थित होते.

Kolhapur, Gadhinglaj-Today
07/08/2023 Page No. 4

केसरी ८ ऑगस्ट २०२३/५

# डीकेएएससीमध्ये अँटी रॅगिंग ॲक्टबाबत मार्गदर्शन

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी :** विधी सेवा समिती हातकणंगले आणि इचलकरंजी बार असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी येथे अँटी रॅगिंग ॲक्ट संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. प्रमुख पाहुणे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी जी. ए. घुले आणि अप्पर पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे–पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक निलेश खाटमोडे–पाटील म्हणाले, एखादा छोटासा गुन्हासुद्धा आपल्या करिअरच्या वाटेवरचा मोठा अडथळा ठरू शकतो. त्यामुळे आपल्याकडून कोणत्याही प्रकारची चूक होणार नाही याची सजगता विद्यार्थ्यांनी ठेवायला हवी.



इचलकरंजी : अँटी रॅगिंग ॲक्ट संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी जी. ए. घुले.

अध्यक्षीय मनोगतात डॉ. अनिल पाटील म्हणाले, दोन्ही मान्यवरांनी अतिशय संवेदनशील विषयावर नेमके केलेले मार्गदर्शन आमच्या विद्यार्थ्यांसाठी मौलिक स्वरूपाचे आहे.

यावेळी इचलकरंजी बार कौन्सिलचे अध्यक्ष ॲड. शिवराज चुडमुंगे यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ. डी. सी. कांबळे यांनी केले. यावेळी प्रा. डी. ए. यादव, ॲड. राजीव शिंगे, ॲड. असिफ मुल्ला, ॲड. सुधीर मस्के, ॲड. दत्ता बडे उपस्थित होते. डॉ. एस. टी. इंगळे यांनी आभार मानले. डॉ. आतिश पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

Scanned with CamScanner

# डीकेएएससीमध्ये शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांना अभिवादन

केसरी वृत्तसेवा

**इचलकरंजी :** दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज येथे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूरचे संस्थापक आणि संकल्पक शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ३६ व्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या उपस्थितीत महाविद्यालयाच्या प्रांगणात बापूजींना अभिवादन करण्यात आले. गुरुदेव कार्यकर्ते डॉ. एस. टी इंगळे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ. डी. सी. कांबळे यांनी केले. यावेळी प्रा. डी. ए. यादव यांच्यासह विद्यार्थिनी उपस्थित होते. प्रा. ए. एस. कटकोळे यांनी आभार मानले.



**शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांना अभिवादन करताना डॉ. अनिल पाटील.**

📞 9921600800

केसरी

13-8-2023

# डीकेएएससीमध्ये राष्ट्रीय ग्रंथपाल दिन साजरा

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी :** दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज येथे ग्रंथालय विभागात भारताचे ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस.आर.रंगनाथन यांची १३१ वी जयंती आणि ‘राष्ट्रीय ग्रंथपाल दिन’ साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्याहस्ते डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले तसेच ‘लायब्ररी होमपेज’ चे उद्घाटन करण्यात आले. डॉ. अनिल पाटील यांनी डॉ.रंगनाथान यांच्या पाच सिद्धांतांचा अवलंब करून वाचन संस्कृती वाढविण्याबाबत मार्गदर्शन केले. प्रास्ताविका विजय यादव यांनी केले. आभार प्रा.रोहित शिंगे यांनी केले. यावेळी डॉ.डी.सी. कांबळे, प्रा.डी. ए. यादव, डॉ.पी.ए.पाटील, डॉ.सांभारे उपस्थित होते.

9921600800

केसरी

18-8-2023

सकाळ शनिवार, १९ ऑगस्ट २०२३



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय ग्रंथपाल दिन साजरा केला.

## डीकेएएससीमध्ये ग्रंथपाल दिन

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयामध्ये भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांची जयंती आणि राष्ट्रीय ग्रंथपाल दिन साजरा केला. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते सरस्वती पूजन, डॉ. एस. आर. रंगनाथन आणि डॉ. बापूजी साळुंखे यांच्या प्रतिमेचे पूजन केले. लायब्ररी होमपेजचे उद्घाटन केले. डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, डॉ. पी. ए. पाटील, प्रा. अरुण कटकोळे उपस्थित होते. प्रास्ताविक ग्रंथपाल विजय यादव यांनी केले. आभार प्रा. रोहित शिंगे यांनी मानले.

Scanned with CamScanner

सकाळ
, सोमवार, २१ ऑगस्ट २०२३



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे स्वागत प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी केले.

# 'डीकेएएससी'मध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ झाला. महाविद्यालयातील हिंदी विभागातर्फे कार्यक्रमाचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते. उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक धोरणासंबंधी मार्गदर्शन केले.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत, २१ ऑगस्ट २०२३



इचलकरंजी : नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करताना प्राचार्य डॉ. अनिल पाटील, समवेत डॉ. डी. सी. कांबळे, अंजली उबाळे व मान्यवर.

# डीकेएएससी महाविद्यालयामध्ये नवागत विद्यार्थी स्वागत

**इचलकरंजी :** येथील दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजमधील हिंदी विभागाच्या बी. ए. भाग ३ आणि एम. ए. भाग १ या वर्गातील विद्यार्थ्यांचा नवागत विद्यार्थी स्वागत समारोह पार पडला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते. प्राचार्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देण्यात आले. प्राचार्य व उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे यांनी नवागतांना नवीन शैक्षणिक धोरणासंबंधी मार्गदर्शन करून शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक हिंदी विभाग प्रमुख प्रा. डॉ. अंजली उबाळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. अर्चना तराळ यांनी केले. अल्फिया सोलापुरी हिने आभार मानले. संयोजन प्रा. अपर्णा कांबळे व प्रा. किशोरी टोणपे यांनी केले. यावेळी प्राध्यापक, प्राध्यापिका, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत २१ ऑगस्ट २०२३

# डीकेएएससीमध्ये राष्ट्रीय ग्रंथपाल दिन

**इचलकरंजी :** दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अॅण्ड कॉमर्स कॉलेज येथे ग्रंथालय विभागात ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांची जयंती आणि राष्ट्रीय ग्रंथपाल दिन साजरा करण्यात आला. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते सरस्वती, डॉ. एस. आर. रंगनाथन, डॉ. बापूजी साळुंखे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. डॉ. अनिल पाटील यांनी डॉ. रंगनाथन यांच्या पाच सिद्धांतांचा अवलंब करून वाचन संस्कृती वाढविण्याबाबत मार्गदर्शन केले. प्रास्ताविकामध्ये ग्रंथपाल विजय यादव यांनी डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या ग्रंथालय शास्त्रातील महत्त्वपूर्ण कार्याविषयी माहिती दिली. आभार प्रा. रोहित शिंगे यांनी केले. यावेळी डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, डॉ. ए. ए. पाटील, डॉ. सांभारे, प्रा. गोडबोले, प्रा. जांभळे, प्रा. हरगणे, प्रा. कटकोळे, प्रा. कोळेकर, प्रा. तराळ, प्रा. टोणपे, प्रा. कांबळे, सौ. साळुंखे, श्री. घोरपडे, शितोळे, विद्यार्थी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

महान कार्य
निज श्रावण शु. ८ विशाखा
दि. २४ ऑगस्ट २०२३

# 'डीकेएएससी' मध्ये विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ सोहळा

इचलकरंजी/ महान कार्य वृत्तसेवा

डीकेएएससी महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे स्वागत प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी केले. डीकेएएससी महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ झाला. महाविद्यालयातील हिंदी विभागातर्फे कार्यक्रमाचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.अनिल पाटील होते. उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक धोरणासंबंधी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक हिंदी विभाग प्रमुख प्रा.अंजली उबाळे यांनी केले. सुत्रसंचालन प्रा.अर्चना तराळ यांनी केले. अल्फिया सोलापूरी हिने आभार मानले.

CS Scanned with CamScanner

सकाळ सोमवार, २८ ऑगस्ट २०२३

# डीकेएएससी महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यशाळा

इचलकरंजी, ता. २७ : येथील डीकेएएससी महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाच्या वतीने एक दिवसीय सांस्कृतिक कार्यशाळा घेण्यात आली. शिवाजी विद्यापीठ युवा महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. डी. सी. कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते. कार्यशाळेत नृत्य दिग्दर्शक ओंकार रोकडे यांनी विद्यार्थ्यांना नृत्याच्या विविध प्रकारांबद्दल मार्गदर्शन केले.

CS Scanned with CamScanner

# दत्ताजीराव कदम कॉलेजमध्ये थिंकर्स फाउंडेशनतर्फे सामंजस्य करार

केसरी वृत्तसेवा

**इचलकरंजी** : येथील दत्ताजीराव कदम आर्ट सायन्स अँड कॉमर्स कॉलेजच्या इंग्रजी विभागामार्फत थिंकर्स फाउंडेशन, गोवा, यांच्याशी सामंजस्य करार करण्यात आला.

या संघटनेतर्फे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय भाषा ऑनलाईन पद्धतीने शिकण्याची संधी उपलब्ध होणार आहे. या उपक्रमासबंधी आर्ट्स, कॉमर्स व सायन्सच्या विद्यार्थांना माहिती देण्यात आली. यावेळी शौर्य बसारिया व रीमा नडाळे यांनी विद्यार्थ्यांचे उद्बोधन केले. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. सुनिता वेल्हाळ यांनी केले व नियोजन डॉ. प्रभा पाटील व प्रा. दीपक देवकर यांनी केले. प्रा. संदीप हरगाणे व अर्चना नंदगावे यांनी सहकार्य केले. सामंजस्य करारासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. सूत्रसंचालन अक्षता करड्यालकर, तर आभार रिया वाठारे हिने मानले.


9921600800

केसरी

29-8-2023

महान कार्य
निज श्रावण शु. १४ धनिष्ठा
दि. ३० ऑगस्ट २०२३



# डी.के.ए.एस.सी.मध्ये थिंकर्स फाउंडेशनतर्फे सामंजस्य करार

इचलकरंजी /महान कार्य वृत्तसेवा

येथील दत्ताजीराव कदम आर्ट सायन्स अँड कॉमर्स कॉलेजच्या इंग्रजी विभागामार्फत थिंकर्स फाउंडेशन, गोवा, यांचेशी सामंजस्य करार करण्यात आला. या संघटनेंतर्फे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय भाषा ऑनलाईन पद्धतीने शिकण्याची संधी उपलब्ध होणार आहे. या उपक्रमासबंधी आर्ट्स, कॉमर्स व सायन्सच्या विद्यार्थांना माहिती देण्यात आली. यावेळी शौर्य बसारिया, रीमा नडाळे यांनी विद्यार्थ्यांचे यासंदर्भात उद्बोधन केले. सदर कार्यक्रमाचे आयोजन इंग्रजी विभाग प्रमुख डॉ.सुनिता वेल्हाळ यांनी केले व कार्यक्रमाचे नियोजन डॉ.प्रभा पाटील, प्रा.दीपक देवकर यांनी यशस्वीरित्या केले. प्रा.संदीप हरगाणे, अर्चना नंदगावे यांनी सहकार्य केले. सदर कार्यक्रमासाठी तसेच सामंजस्य करारासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनिल पाटील यांचे बहुमोल सहकार्य व मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अक्षता करड्यालकर हिने केल. रिया वाठारे हिने आभार मानले. या वेळी बहुसंख्य विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ बुधवार, ३० ऑगस्ट २०२३



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात थिंकर्स फाउंडेशनतर्फे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय भाषा शिक्षण उपक्रमाबाबत माहिती दिली.

# डीकेएएससी महाविद्यालयामध्ये इंग्रजी विभागातर्फे भाषा शिक्षण उपक्रम

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात इंग्रजी विभागातर्फे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय भाषा शिक्षण उपक्रम झाला. थिंकर्स फाउंडेशन, गोवा यांच्याशी सामंजस्य करार केला असून, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय भाषा ऑनलाईन पद्धतीने शिकण्याची संधी उपलब्ध होणार आहे. या उपक्रमासंबंधी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. यावेळी शौर्य बसारिया, रीमा नडाळे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आयोजन इंग्रजी विभागप्रमुख डॉ. सुनीता वेल्हाळ यांनी केले. नियोजन डॉ. प्रभा पाटील व प्रा. दीपक देवकर यांनी केले. प्रा. संदीप हरगाणे व अर्चना नंदगावे यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. अक्षता करड्यालकर हिने सूत्रसंचालन केले. रिया वाठारे हिने आभार मानले.

CS Scanned with CamScanner

सकाळ बुधवार, ३० ऑगस्ट २०२३

**डीकेएएससी महाविद्यालय**

फिट इंडिया रॅलीचे आयोजन करण्यात आले. उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे यांनी मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. फिट इंडिया दौड महाविद्यालय ते शिवतीर्थ या प्रमुख मार्गावरून काढण्यात आली. यामध्ये एनएसएस व एनसीसी विद्यार्थी व विद्यार्थिनी यांचा उत्स्फूर्त सहभाग होता. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखली कार्यक्रम झाला. क्रीडा दिनाचे महत्त्व प्रा. विनायक भोई यांनी विशद केले. प्रा. मुजफ्फर लगीवाले यांनी प्रास्ताविक केले. या वेळी एनएसएस कार्यक्रम अधिकारी प्रा. अरुण कटकोळे, प्रा. प्रशांत कांबळे, डॉ. अनिल जांभळे, प्रा. डॉ. रिटा रॉड्रिग्ज उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner




इचलकरंजी : स्वागत समारंभात बोलताना डॉ. डी. सी. कांबळे. यावेळी उपस्थित डॉ. सुनिता वेल्हाळ, डॉ. प्रभा पाटील.

# दत्ताजीराव कदम महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी :** येथील दत्ताजीराव कदम आर्ट सायन्स अँड कॉमर्स कॉलेजच्या इंग्रजी विभागामार्फत बी.ए. भाग एक मध्ये प्रवेशित ऐच्छिक इंग्रजी विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणुन उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे होते. अध्यक्षस्थानी इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. सुनिता वेल्हाळ होत्या. यावेळी बी.ए. भाग २ व ३ च्या विद्यार्थ्यांनीनी काही मनोरंजनात्मक खेळ आयोजित केले. डॉ. प्रभा पाटील यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. प्रा. संदीप हरगाणे, प्रा. दीपक देवकर, प्रा. अर्चना नंदगावे यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन तिक्षा लोहार व साक्षी भोसले यांनी केले. आभार ऐश्वर्या हिने मानले. रिया वाठारे, कोमल टोंगे, अक्षता करड्यालकर, अवंतिका खराडे, श्रेया मोळे यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांचे सहकार्य लाभले.

9921600800

केसरी

30-8-2023


दक्षिण महाराष्ट्र
केसरी

३१ ऑगस्ट २०२३/५

# 'डीकेएएससी'मध्ये सांस्कृतिक विभागाची कार्यशाळा संपन्न

केसरी वृत्तसेवा

**इचलकरंजी :** येथील दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय सांस्कृतिक कार्यशाळेचे आयोजन केले होते. शिवाजी विद्यापीठ युवा महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. डी. सी. कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा पार पडली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते.




**इचलकरंजी : कार्यशाळेत मार्गदर्शन करताना नृत्यदिग्दर्शक ओंकार रोकडे, प्राचार्य डॉ. अनिल पाटील, डॉ. डी. सी. कांबळे.**

यावेळी प्रसिद्ध नृत्य दिग्दर्शक ओंकार रोकडे यांनी विद्यार्थ्यांना नृत्याच्या विविध प्रकारांबद्दल मार्गदर्शन केले. ते म्हणाले, इतर कलांप्रमाणे नृत्यकला सादर करत असताना तुमची त्या कलेप्रति सर्वोत्तम कष्ट घेऊन सादरीकरण करण्याची तयारी असली पाहिजे. यासाठी आपण मनातून प्रचंड मजबूत असलं पाहिजे.

प्रास्ताविक डॉ. डी. सी. कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन संजीवनी कदम हिने केले. आभार योगिता सोनटक्के हिने मानले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत शुक्रवार १ सप्टेंबर २०२३

# डीकेएएससी महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिवस साजरा

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयात महान हॉकी खेळाडू मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस अर्थात राष्ट्रीय क्रीडा दिवस उत्साहात साजरा झाला. मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन सकाळ सत्र प्रमुख डॉ. डी सी कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले.

क्रीडा दिनाचे औचित्य साधून खेळाडू व विद्यार्थ्यांसाठी व्याख्यानाचे आयोजन केले होते. इचलकरंजीचे क्रिकेटपटू आनंदा दोपारे यांनी मुलांना खेळाचे आयुष्यातील असणारे महत्त्व आणि याचबरोबर त्यांच्या जीवनातील क्रिकेटचे किस्से यावर दिलखुलास संवाद साधला. यावेळी राजाराम स्टेडियमच्या उद्घाटनप्रसंगी भरलेला प्रदर्शनीय सामना व त्यादरम्यान घडलेला किस्सा विद्यार्थ्यांच्या मनात घर करून राहिला. प्राचार्य डॉ.अनिल पाटील यांनी विद्यार्थ्यांना खेळामधून येणारी खिलाडूवृत्ती आयुष्यातल्या अनेक प्रसंगांमध्ये कामाला येते त्यामुळे खेळ खेळले पाहिजेत, असा संदेश दिला. प्रास्ताविक प्रा. मुजफ्फर लघवीवाले यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. विनायक भोई यांनी करून दिला. प्रा. प्रशांत कांबळे यांनी आभार मानले. यावेळी खेळाडू, विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्राध्यापक उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. रोहित शिंगे यांनी केले.

CS Scanned with CamScanner

महान कार्य
निज श्रावण कृ.२ पू. भाद्रपदा
दि.१ सप्टेंबर २०२३

# डिकेएससी कॉलेजमध्ये क्रीड दिन उत्साहात साजरा

इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा

येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयात महान हॉकी खेळाडू मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस अर्थात राष्ट्रीय क्रीडा दिवस उत्साहात साजरा झाला. २९ ऑगस्ट रोजी मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन सकाळ सत्र प्रमुख डॉ. डी सी कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे इचलकरंजीचे प्रसिद्ध क्रिकेटपटू आनंदा दोपारे यांनी मुलांना आपल्या खेळाचे आयुष्यातील असणारे महत्त्व आणि याचबरोबर त्यांच्या जीवनातील क्रिकेटचे किस्से यावर दिलखुलास संवाद साधला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.अनिल पाटील यांनी विद्यार्थ्यांना खेळामधून येणारी खिलाडीवृत्ती आयुष्यातल्या अनेक प्रसंगांमध्ये कामाला येते त्यामुळे खेळ खेळले पाहिजेत असा संदेश देत खेळाडूंना क्रीडा दिनाच्या शुभेच्छा दिल्या. स्वागत प्रास्ताविक प्रा.मुजफ्फर लगिवाले यांनी केले तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा.विनायक भोई यांनी करून दिला. प्रा प्रशांत कांबळे यांनी आभार मानले. यावेळी खेळाडू विद्यार्थी विद्यार्थिनी प्राध्यापक प्राध्यापिका उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा.रोहित शिंगे यांनी केले.

Scanned with CamScanner

सकाळ
सोमवार, ४ सप्टेंबर २०२३




इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात क्रीडा सप्ताहानिमित्त क्रिकेटपटू आनंदा दोपारे यांचे व्याख्यान झाले.

## 'डीकेएएससी' महाविद्यालयात आनंदा दोपारेंचे व्याख्यान


इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन सप्ताहानिमित्त व्याख्यान झाले. प्रमुख पाहुणे इचलकरंजीतील प्रसिद्ध क्रिकेटपटू आनंदा दोपारे यांनी खेळाचे आयुष्यातील महत्त्व आणि याचबरोबर जीवनातील क्रिकेटचे किस्से यावर संवाद साधला. राजाराम स्टेडियमच्या उद्घाटनप्रसंगी भरलेला राष्ट्रीय प्रदर्शनीय सामना आणि त्यादरम्यान घडलेले अनेक किस्से विद्यार्थ्यांच्या मनात घर करून राहिले. डॉ. डी. सी. कांबळे यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षस्थानावरून बोलताना प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी विद्यार्थ्यांना खेळामधून येणारी खिलाडूवृत्ती आयुष्यातल्या अनेक प्रसंगांमध्ये कामाला येत असल्याचे सांगितले. प्रा. मुजफ्फर लगिवाले यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. विनायक भोई यांनी करून दिला. प्रा. रोहित शिंगे यांनी सूत्रसंचालन केले. प्राएम प्रशांत कांबळे यांनी आभार मानले.

CS Scanned with CamScanner

दैनिक महासत्ता

मंगळवार, ता.५ सप्टेंबर २०२३

# लायन्स क्लबचे गुणवंत शिक्षक पुरस्कार जाहीर



विजय पाटील — शामल म्हेतर — डॉ.संतोष नेवसे — गीता खोचरे — वर्षा कुलकर्णी

इचलकरंजी, ता.४–

......................


डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिनी साजरा होणाऱ्या शिक्षक दिनाचे औचित्य साधून लायन्स क्लब ऑफ इचलकरंजीने यावर्षीचे गुणवंत शिक्षक पुरस्कार जाहीर केले.

यावर्षीच्या लायन्स गुणवंत शिक्षक पुरस्कारासाठीची निवड पुरस्कार कमिटी चेअरमन गजानन होगाडे यांनी केली. यासाठी त्यांना विजयकुमार राठी व लिंगराज कित्तुरे यांचे सहकार्य लाभले. लायन्स क्लब ऑफ इचलकरंजीचे अध्यक्ष श्रीकांत सारडा यांनी पुरस्कार प्राप्त शिक्षकांची नावे जाहीर केली.

निवडण्यात आलेल्या गुणवंत शिक्षकांमध्ये महाविद्यालयीन विभागातून प्रा.विजय पाटील (दत्ताजीराव कदम ए.एस.सी. कॉलेज), उच्च माध्यमिक विभागातून शामल म्हेतर (तात्यासाहेब मुसळे विद्यालय आणि ज्युनिअर कॉलेज), माध्यमिक विभागातून डॉ. संतोष नेवसे (आंतरभारती विद्यालय), प्राथमिक विभागातून सौ. गीता खोचरे (आदर्श विद्यामंदिर) व बालवाडी विभागातून सौ.वर्षा कुलकर्णी (समर्थ बाल विद्यामंदिर) यांचा समावेश आहे. यावेळी डॉ.विलास शहा, खजिनदार कृष्णा भराडिया, महेश सारडा, सौ. संगीता सारडा, सौ.कनकश्री भट्टड, विनय महाजन व क्लबचे सदस्य उपस्थित होते.

Scanned with CamScanner

सकाळ
कोल्हापूर, गुरुवार, ७ सप्टेंबर २०२३



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

# सुशिलादेवी साळुंखे यांना अभिवादन

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयात संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन केले. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते सुशिलादेवी साळुंखे यांच्या प्रतिमेचे पूजन केले. संस्थेच्या उभारणीत शिक्षण महर्षी बापूजी साळुंखे यांच्या बरोबरीने गुरुदेव कार्यकर्त्यांवर संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांनी महत्त्वपूर्ण संस्कार केल्याचे प्राचार्य डॉ. पाटील यांनी मनोगतातून सांगितले. प्रा. ए. एस. कटकोळे यांनी मनोगत व्यक्त केले. उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, प्रा. विनायक भोई, प्रा. डॉ. सुनीता वेल्हाळ, प्रा. प्रशांत कांबळे आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत गुरुवार ७ सप्टेंबर २०२३

# डीकेएएससीमध्ये सुशीलादेवी साळुंखेंना अभिवादन

इचलकरंजी : येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयात संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या बरोबरीने ही संस्था उभी करत संस्थेवर, अध्यापकांवर संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांनी महत्वपूर्ण संस्कार केले. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. प्रा. ए. एस. कटकोळे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, प्राध्यापक, प्राध्यापिका, विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्रशासकीय, कर्मचारी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

# डीकेएएससीमध्ये शिक्षकदिनी काव्यवाचन स्पर्धा संपन्न

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी** : येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. हिंदी काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. शिक्षक दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयातील हिंदी आणि एनसीसी विभागातील विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या भुमिकेत अध्यापनाचे काम केले.

काव्यवाचन स्पर्धेचे उद्घाटन मराठी विभागाचे प्रा. रोहित शिंगे यांच्या कविता सादरीकरणाने झाले. विद्यार्थ्यांनी उत्साहाने या स्पर्धेत सहभाग नोंदवला. प्रा. दीपक देवकर यांनी स्पर्धेचे परीक्षण केले. विद्यार्थ्यांनी सर्व प्राध्यापकांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचा शिक्षक दिनानिमित्त सत्कार केला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन प्राचार्य डॉ. अनिल पाटील उपस्थित होते.

प्रास्ताविकविद्यार्थिनी आकांक्षा भांड हिने केले. संयोजन डॉ. अंजली उबाळे, प्रा. अर्चना तराळ, प्रा. अपर्णा कांबळे, प्रा. किशोरी टोणपे यांनी केले. यावेळी डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, प्रा. विनायक भोई, डॉ. सुनिता वेल्हाळ उपस्थित होते. आभार सुमित वडर, तर सूत्रसंचालन प्रीती भिसे, प्रियांका शिंदे यांनी केले.

📞 9921600800
केसरी
8-9-2023

तरुण भारत शनिवार ९ सप्टेंबर २०२३



इचलकरंजी : काव्यवाचन स्पर्धेत कविता सादर करताना विद्यार्थिनी. यावेळी उपस्थित प्राचार्य डॉ. अनिल पाटील, डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, डॉ अंजली उबाळे.

# डीकेएएससी महाविद्यालयामध्ये हिंदी काव्यवाचन स्पर्धा

इचलकरंजी : येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयात शिक्षक दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयातील हिंदी व एनसीसी विभागाच्यावतीने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी या निमित्ताने हिंदी विभागाच्यावतीने हिंदी काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन केले होते. स्पर्धेचे उद्घाटन मराठी विभागाचे प्रा. रोहित शिंगे यांच्या कविता सादरीकरणाने झाले. इंग्रजी विभागातील प्रा. दिपक देवकर हे परीक्षक होते. प्राध्यापकांना पुष्पगुच्छ देऊन विद्यार्थ्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी प्राध्यापक व विद्यार्थ्यांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा देऊन आयुष्यातील शिक्षकांचे महत्व सांगत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक आकांक्षा भांड हिने केले. संयोजन हिंदी विभाग प्रमुख प्रा. डॉ अंजली उबाळे, प्रा. अर्चना तराळ, प्रा. अपर्णा कांबळे, प्रा. किशोरी टोणपे यांनी केले. यावेळी सकाळ सत्र प्रमुख डॉ. डी. सी. कांबळे, दुपार सत्र प्रमुख प्रा. डी. ए. यादव, एनसीसी प्रमुख प्रा. विनायक भोई, डॉ. सुनिता वेल्हाळ, प्राध्यापक, प्राध्यापिका, विद्यार्थी, विद्यार्थीनी, एनसीसी कॅडेट उपस्थित होते. आभार सुमित वडर याने मानले. सूत्रसंचालन प्रीती भिसे, प्रियांका शिंदे यांनी केले.

CS Scanned with CamScanner

सकाळ कोल्हापूर, सोमवार, ११ सप्टेंबर २०२३





इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात काव्यवाचन स्पर्धेत विद्यार्थ्यांनी कविता सादर केल्या.

## 'डीकेएएससी'मध्ये काव्यवाचन स्पर्धा

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात हिंदी आणि एनसीसी विभागातर्फे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी काव्यवाचन स्पर्धा झाल्या. स्पर्धेचे उद्घाटन मराठी विभागाचे प्रा. रोहित शिंगे यांच्या कविता सादरीकरणाने झाले. विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग नोंदवला. परीक्षक म्हणून इंग्रजी विभागातील प्रा. दीपक देवकर यांनी काम पाहिले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते. प्रमुख डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, एनसीसी प्रमुख प्रा. विनायक भोई, डॉ. सुनीता वेल्हाळ आदी उपस्थित होते. संयोजन हिंदी विभागप्रमुख प्रा. डॉ. अंजली उबाळे, प्रा. अर्चना तराळ, प्रा. अपर्णा कांबळे, प्रा. किशोरी टोणपे यांनी केले. आकांक्षा भांड हिने प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन प्रीती भिसे, प्रियांका शिंदे यांनी केले. सुमित वडर याने आभार मानले.

CS Scanned with CamScanner

सकाळ
कोल्हापूर, सोमवार, ११ सप्टेंबर २०२३




इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात आयोजित शिक्षक आणि विद्यार्थी एकदिवसीय कार्यशाळेत गणेश सातव यांनी मार्गदर्शन केले.

# शिक्षक, विद्यार्थ्यांसाठी डीकेएएससीमध्ये कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**

इचलकरंजी, ता. १० : डीकेएएससी महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र विभागातर्फे शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय कार्यशाळा झाली.

हवामान शिक्षणावर शिक्षकांचे प्रशिक्षण आणि सुरक्षित ग्रहासाठी ग्रीन कॅम्पस या विषयावर कार्यशाळा झाली. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

प्रमुख वक्ते गणेश सातव यांनी मानवी हस्तक्षेपामुळे होणारे पर्यावरणतील बदल, त्यामुळे होणारा जैवविविधतेचा ऱ्हास, पर्यवारण असंतुलनाचा मानवी जीवनावर होणारा परिणाम यावर माहिती दिली. पर्यावरण संतुलन राखण्यासाठी दैनंदिन सवयीतून करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबद्दल माहिती दिली. उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यशाळेचे आयोजन वनस्पतीशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. एस. टी. इंगळे यांनी केले. डॉ. मधुमती शिंदे, डॉ. आम्रपाली कट्टी यांनी समन्वयक म्हणून काम पहिले.

Scanned with CamScanner

सकाळ
कोल्हापूर, शुक्रवार, १५ सप्टेंबर २०२३



इचलकरंजी : जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत डीकेएएससी महाविद्यालयाने यश मिळवले.

## जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत डीकेएएससी महाविद्यालयाचे यश

**इचलकरंजी :** जिल्हास्तरीय बुध्दिबळ स्पर्धेत डीकेएएससी महाविद्यालयाने यश मिळवले. आदित्य लोखंडे याने १७ वर्षाखालील गटात प्रथम, तर प्रणव पवार याने १९ वर्षाखालील गटात तृतीय क्रमांक प्राप्त केला. दोघांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. महानगरपालिकेतर्फे शासकीय शालेय बुध्दिबळ स्पर्धा व्यंकटराव हायस्कूल येथे झाल्या. दोघांचा प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी सत्कार केला. त्यांना शारीरिक शिक्षण संचालक प्रा. विनायक भोई, प्रा. मुझफ्फर लगीवाले, प्रा. प्रशांत कांबळे आदींचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner